सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

१ स्वागत मूल्य रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १०३ | शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

# अमळनेरचे पालिका राजकारण : आते चेटनं रे भो...!





अमळनेर : माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या आक्षेपार्ह विधानाच्या विरोधात निघालेला निषेध मोर्चा. दुसऱ्या छायाचित्रात शिरीषदादांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करतांना आमदार अनिलदादांचे समर्थक. (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

# शिरीषदादा चौधरींच्या वक्तव्याचा निषेध!

## अनिलदादा समर्थकांचा पालिकेवर धडक मोर्चा बांगड्यांचा आहेर, प्रतिकात्मक पुतळ्याचे केले दहन!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेत नवनिर्वाचित नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांचा गुरुवार, दि. १ डिसेंबर रोजी पदग्रहण सोहळा झाला. यावेळी माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी आमदार अनिलदादा पाटील यांच्या पत्नी विरोधात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ शुक्रवार, दि. २ डिसेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समर्थकांनी पालिकेवर संतप्त मोर्चा काढला. शिरीषदादा चौधरी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यास जोडेमारो आंदोलन करण्यात आले. बांगड्यांचा आहेर देण्यात आला. त्यानंतर प्रतिमेचे दहन करण्यात आले. शिरीष चौधरी मुर्दाबादच्या घोषणांनी पालिका परिसर दणाणला होता.

महिला पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी पालिकेच्या प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन केले. शिरीषदादांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करण्यात आला. पालिकेपासून शिरीषदादा चौधरी यांच्या कार्यालयाजवळ मोर्चा आल्यावर मोर्चेकऱ्यांनी जोरदार निषेध केला. शिरीषदादा यांच्या कार्यालयासमोर बांगड्या फेकण्यात आल्या. टाळ्या वाजवून मुर्दाबादच्या घोषणा देत संताप व्यक्त करण्यात आला. कार्यालयासमोर मोर्चेकऱ्यांनी ठियाही मांडला. अनिलदादांचे कार्यकर्ते व शिरीषदादांचे कार्यकर्ते समोरासमोर भिडले. यावेळी मोठी घोषणाबाजी झाली. परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी घटनास्थळी पोलीस उपअधीक्षक विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांना प्रयत्नांची शिकस्त करावी लागली. मोठा पोलीस बंदोबस्त असल्याने परिस्थिती नियंत्रणात राहिली. विद्यार्थी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भूषण भदाणे यांनी भाषणातून विरोधकांवर प्रखर टिका केली.

### अन्यथा झाला असता अनर्थ..!

शिरीषदादा चौधरी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्यावर काही उत्साही कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणावर पेट्रोल टाकून त्यास जाळले. पेट्रोलचा प्रमाणाबाहेर वापर झाल्याने पुतळ्याने एकदम मोठा पेट घेतला. त्यातच अजून काही उत्साही कार्यकर्त्यांनी पेटत्या पुतळ्यावर जुने टायर टाकले. परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम यांनी पायाने आग विझविण्याचा प्रयत्न केला. सोबतच संयम राखून संतप्त कार्यकर्त्यांना नियंत्रणात ठेवण्यासाठी सर्व प्रकारचे कसब वापरले.

### प्रथमच झाली मोर्चाने बोहणी..!

येथील नवनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या निवडीच्या निमित्ताने काही चांगले विक्रम झाले आहेत. मात्र, रात्री पदभार आणि दुसऱ्या दिवशी थेट निषेध मोर्चा अशा प्रकारचा विचित्र विक्रमही पालिका कारकिर्दीत प्रथमच पहावयास मिळाला. साधारणतः पहिल्या दिवशी नगराध्यक्षांच्या स्वागतासाठी नागरिकांची पालिकेत गर्दी असते. येथे मात्र घडले भलतेच...!! दरम्यान, पालिकेच्याच कामानिमित्त नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर शुक्रवार, दि. २ जानेवारी रोजी जळगावी असल्याने ते आज आले नाहीत, असे पालिकेतील सूत्रांनी सांगितले.



शिरीषदादांच्या कार्यालयासमोर मोठा राडा होऊ नये यासाठी प्रयत्न करताना पीआय निकम व कर्मचारी.



“अमळनेर संतांची भूमी आहे. येथे महिलांचा आदर केला जातो. मात्र, आता राजकारण खूप ढासळले आहे. सौ. जयश्रीताई एक निमित्त आहे. एकीकडे महिला महोत्सव साजरा होत आहे. तर दुसरीकडे आमची प्रतिमा ढासळत आहे. तमाम महिला या वक्तव्याचा निषेध व्यक्त करीत आहेत. शिरीषदादा चौधरी यांनी जाहीर माफी मागावी.

**– सौ. तिलोत्तमाताई पाटील,** ज्येष्ठ नेत्या



“माजी आमदार शिरीष चौधरी यांनी जयश्री ताईंबद्दल अपमानास्पद वक्तव्य करायला नको होते. जयश्रीताईंचा नव्हे हा आमचा सर्वांचा अपमान आहे. सावित्री, जिजाऊंचे अमळनेर आहे. या ठिकाणी शांतताच हवी. या बेताल वक्तव्याचा आम्ही सर्व महिला निषेध व्यक्त करतो.

**– सौ. सुलोचनाताई वाघ,** जिल्हाध्यक्षा, महिला काँग्रेस.



“माजी आमदारांनी जे बेताल वक्तव्य केले आहे ते केवळ जयश्रीताई यांच्या संदर्भातच नसून आम्हा सर्व महिलांचा अपमान आहे. विजयासोबतच पराभव पचविण्याची क्षमता असलेला माणुसच यशापर्यंत पोहोचतो. आपल्याला मिळालेल्या यशाचे रुपांतर दादागिरीत व्हायला नको. झाल्या प्रकाराबाबत सर्व माता-भगिनींसमोर माफी मागितली गेली पाहिजे.

**– सौ. वसुंधराताई लांडगे,** संचालिका, अर्बन बँक.



“शिरीषदादा चौधरी यांना महिलांचे वर्चस्व सहन होत नाही, हेच झाल्या प्रकारावरून लक्षात येते. सौ. जयश्रीताई पाटील या प्रतिष्ठीत नागरिक आहेत. त्यांच्याविषयी वक्तव्य करताना कोणताही सारासार विचार करण्यात आला नाही. व्यासपीठावर उपस्थित महिलांनी तरी या वक्तव्याचा विरोध करायला हवा होता.

**– प्रा. सौ. मंदाकिनीताई भामरे,** महिला तालुकाध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस.



“माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी घरातील महिलांप्रमाणेच अन्य महिलांचाही आदर राखला पाहिजे. विजयाचा आनंद व्यक्त करणे, जल्लोष करणे यात काही गैर नाही. मात्र, माता-भगिनींवर शिंतोडे उडविणे अतिशय गैर आहे. या प्रकाराचा करावा तेवढा निषेध कमी आहे.

**– सौ. नुतनताई पाटील.**




## माझ्या पत्नीवर केलेली टिका संस्कृतीबाह्य असल्याने असहनीय..

### आमदार अनिलदादा पाटील : शिरीषदादा चौधरींना कार्य स्पर्धेचे खुले आव्हान...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राजकीय जीवनात अनेक यश- अपयश पचविले आहेत. विरोधात राहूनही राजकारण व समाजकारण करता येते. त्यामुळे नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत आम्ही पराभूत झालो, ही हार आम्हाला मान्य आहे. मात्र, महिलेबाबत असभ्य टिपणी करणे, ही आपली संस्कृती नाही. असभ्य टिपणीबाबत काही व्यासपीठावरील व काही उपस्थितांतील लोकांनी वाजविलेल्या टाळ्या धक्कादायक आहेत. एकूणच प्रकार असहनीय असून, आम्ही याबाबत निषेध व्यक्त करतो, असे प्रतिपादन आमदार अनिलदादा पाटील यांनी शुक्रवार, दि. २ जानेवारी रोजी बोलाविलेल्या पत्रकार परिषदेत केले.

दि. १ जानेवारी रोजी नगराध्यक्षांच्या पदग्रहण समारोहात माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी आमदार अनिलदादा पाटील यांच्या पत्नीविरूद्ध आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्याचा निषेध करण्यासाठी आमदार अनिलदादा यांनी सदर पत्रकार परिषद बोलाविली होती.

अनिलदादा पुढे म्हणाले, की नुकत्याच झालेल्या पालिका निवडणुकीत आमचा पराभव झाला असला तरी विरोधकांनाही पूर्ण यश मिळालेले नाही. राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या उमेदवारांना मिळालेले मतदान अधिक आहे. माजी आमदार शिरीषदादा पाच वर्षात अमळनेरला फिरकलेही नाहीत. ज्या व्यासपीठावर काल त्यांनी वक्तव्य केले त्या व्यासपीठाखालील रस्ताही मी बनविलेला आहे. त्यांचा जेथपर्यंत आवाज जात होता त्या सर्व भागातील रस्ते मी बनविले आहेत. त्यांच्या आमदारकीच्या कार्यकाळात त्यांन केलेल्या विकासकामांची तुलना खुल्या चर्चेचे आव्हान देतो.

राजकीय, सामाजिक क्षेत्रा करणाऱ्या महिलांना कुटुंबीयांचे असते. त्यामुळेच त्या कार्य शकतात. माझ्या अनुपस्थितीम माझी पत्नी नागरिकांच्या सुख दुःखात सहभागी असते. कार्यकर्त्यांना समजून घेणे, त्यांच्या समस्या दूर करणे, त्यांची काळजी घेणे, त्यांचा सन्मान करणे हे सारे काही त्याच करत असतात. यात चुकीचे काय आहे ? अशा महिलेविरूद्ध असभ्य टिपणी करणे कितपत योग्य आहे ? अमळनेरकरांना हेच पाहायचे होते काय ?

मी सर्वच वयोगटातील महिलांचा मुलगी, भगिनी व मातेसमान मानून आदर

पान ३ वर

## केवळ द्वेषभावनेतून माझ्यावर आरोप

### माजी आमदार शिरीषदादा चौधरी; नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्यातील वक्तव्यावर स्पष्टीकरण

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिका निवडणुकीनंतर गुरुवार, दि. १ जानेवारी रोजी नगराध्यक्ष पदग्रहण सोहळ्यानिमित्त आभार सभा झाली. त्यात माझ्या भाषणाचा काहींनी मुद्दाम चुकीचा अर्थ लावला आहे. हा प्रकार म्हणजे समाजमाध्यमांवर माझी वैयक्तिक बदनामी करण्याचा प्रयत्न आहे. यासंदर्भात विरोधकांकडे कोणताही ठोस पुरावाही नाही. केवळ पराभव स्वीकारण्याचे धैर्य नसल्याने द्वेषभावनेतून अफवा पसरविली जात असून, खोटे आरोप केले जात आहेत, असे स्पष्टीकरण माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे दिले आहे.

आभार सभेत माझ्या वक्तव्यात कोणत्याही स्त्रीचा, समाजाचा किंवा व्यक्तीचा अपमान करणे हा उद्देश नव्हता. भविष्यातही तो राहणार नाही. स्त्री ही माझ्यासाठी सदैव माता-भगिनी समान आहे. त्यांचा सन्मान राखणे ही माझी सामाजिक व नैतिक जबाबदारी आहे. मात्र, विरोधकांनी भाषणातील काही शब्दांना संदर्भापासून तोडून-मोडून, काल्पनिक अर्थ लावून सोशल मीडियावर टाकल्यामुळे जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा हा प्रयत्न केला आहे. माझ्या भाषणाची पूर्ण क्लिप ऐकूनच मत व्यक्त करावे. अर्धवट व्हिडिओ अथवा कापलेल्या क्लिपवर विश्वास ठेवू नये, अशी जनतेला नम्र विनंती आहे. मी कोणत्याही प्रकारच्या द्वेषमूलक, महिलांचा अनादर करणाऱ्या किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या विधानांना समर्थन देत नाही आणि देणारही नाही. अमळनेर शहरातील सामाजिक सलोखा, ऐक्य आणि परस्पर आदर टिकवणे हाच माझा मुख्य हेतू आहे आणि पुढेही राहील. अमळनेरकर जनतेवर असलेला माझा विश्वास अढळ आहे. विकास, शांतता आणि सभ्यता हाच माझा मार्ग आहे. पराजय स्वीकारण्याची मानसिक तयारी नसल्याने द्वेषभावनेतून माझ्याविरोधात अपप्रचार केला जात आहे, हे अत्यंत दुर्दैवी आहे. माझा हेतू हा होता, की अनेक मंत्री, आमदार व खासदारांनी आपल्या धर्मपत्नीला बिनविरोध निवडून आणलेले आहे. मात्र, काही समाजकंटक राजकीय द्वेषापोटी माझी चुकीच्या पद्धतीने बदनामी करत आहेत.



# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले : भारतीय स्त्रीशिक्षणाच्या आद्य जननी

**जयंती विशेष**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी ३ जानेवारी हा दिवस भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी स्त्रीशिक्षणाची पहिली ज्योत पेटवणाऱ्या, सामाजिक अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे लढणाऱ्या आणि स्त्री-शूद्र-अतिशूद्रांच्या हक्कांसाठी आयुष्य वाहून घेणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी केली जाते. सावित्रीबाई फुले या केवळ शिक्षिका नव्हत्या, तर त्या एक दूरदृष्टीच्या समाजसुधारक, कवयित्री, विचारवंत आणि स्त्रीस्वातंत्र्याच्या अग्रदूत होत्या.

### बालपण आणि शिक्षण

सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे झाला. त्या काळात स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. बालविवाहाची रूढी असल्याने त्यांचा विवाह लहान वयातच महात्मा ज्योतिराव फुले यांच्याशी झाला. ज्योतिराव फुले यांच्या प्रेरणेने सावित्रीबाईंनी शिक्षण घेतले आणि शिक्षणाचे महत्त्व ओळखून समाज परिवर्तनाचा मार्ग स्वीकारला.

### स्त्रीशिक्षणाची मुहूर्तमेढ

१८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात देशातील पहिली मुलींची शाळा सुरू करून सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीशिक्षणाची क्रांती घडवली. त्या भारतातील पहिल्या स्त्री शिक्षिका ठरल्या. समाजातील रूढी, अंधश्रद्धा आणि विरोध यांचा सामना करत



त्या दररोज शाळेत जात असताना त्यांच्यावर शेण, दगडफेक केली जात असे; तरीही त्यांनी आपले कार्य कधीच थांबवले नाही. शिक्षण हाच समाजबदलाचा प्रभावी मार्ग आहे, यावर त्यांचा ठाम विश्वास होता.

### सामाजिक सुधारणांचे कार्य

सावित्रीबाई फुले यांनी केवळ शिक्षणापुरतेच कार्य मर्यादित ठेवले नाही. त्यांनी विधवा महिलांसाठी आश्रयगृहे सुरू केली, बालहत्या प्रतिबंधासाठी कार्य केले आणि अस्पृश्यता, जातीय भेदभाव याविरुद्ध आवाज उठवला. समाजातील उपेक्षित, दुर्बल घटकांसाठी त्यांनी आयुष्यभर संघर्ष केला.

### साहित्यिक योगदान

सावित्रीबाई फुले या संवेदनशील कवयित्रीही होत्या. त्यांच्या कविता समाजाला जागृत करणाऱ्या होत्या. 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे त्यांचे साहित्य सामाजिक प्रबोधनाचे महत्त्वपूर्ण साधन ठरले. त्यांच्या कवितांमधून स्त्रीस्वातंत्र्य, शिक्षण आणि समानतेचा संदेश स्पष्टपणे उमटतो.

### आदर्श वारसा

१८९७ मध्ये पुण्यात प्लेगची साथ पसरली असताना सावित्रीबाईंनी रुग्णांची सेवा करताना स्वतःचे प्राण अर्पण केले. त्यांचे जीवन हे त्याग, सेवा आणि समतेचे प्रतीक आहे. त्यांनी दाखवलेला मार्ग आजही समाजासाठी दिशादर्शक ठरतो. सावित्रीबाई फुले यांचे कार्य आजच्या काळात अधिकच प्रेरणादायी आहे. स्त्रीशिक्षण, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या मूल्यांसाठी त्यांनी दिलेला लढा आजही तितकाच महत्त्वाचा आहे. सावित्रीबाई फुले जयंती साजरी करताना केवळ त्यांच्या प्रतिमेला अभिवादन न करता त्यांच्या विचारांचा वारसा जपण्याची आणि समाजात समानता, शिक्षण व माणुसकी रुजवण्याची गरज आहे.

**क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे विनम्र अभिवादन...!**

# पूड़ी का बचा तेल न करें वेस्ट



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भीलवाड़ा में घरों में पूड़ी तलने के बाद बचा तेल अक्सर फेंक दिया जाता है या बार-बार गर्म किया जाता है, जो स्वास्थ्य के लिए हानिकारक हैं। हालांकि, यदि इसे सही तरीके से छाना और कांच की बोतल में ठंडा करके रखा जाए, तो यह सुरक्षित रूप से दोबारा इस्तेमाल किया जा सकता हैं। इस तेल का उपयोग केवल तड़का लगाने या पराठे सेंकने जैसे हल्के कामों में करें और इसे दो बार से अधिक गर्म न करें। यह तरीका आपकी सेहत को नुकसान पहुंचाए बिना बर्बादी रोकने और बचत करने में मदद करता है।

भीलवाड़ा। आमतौर पर देखा जाता है कि घर में कोई छोटा प्रोग्राम हो या बड़ा कार्यक्रम, जिसमें महमानों के लिए पुड़ियाँ बनाई जाती हैं। लेकिन पूड़ी तलने के बाद काफी मात्रा में तेल बच जाता है। कई लोग इसे या तो फेंक देते हैं या बार-बार गरम करके इस्तेमाल करते हैं, जो सेहत के लिए हानिकारक हो सकता है। इस प्रकार, बचे हुए तेल का प्रबंधन एक समस्या है। लेकिन अगर इस तेल को सही तरीके से छाना और रखा जाए, तो यह दोबारा इस्तेमाल के लायक बन सकता है और बर्बादी भी नहीं होगी। इस तरह, तेल को सुरक्षित तरीके से रीसायकल करना स्वास्थ्य और अर्थव्यवस्था दोनों के लिए फायदेमंद होता है।

सबसे पहले ध्यान देने वाली बात यह है कि तेल को तलने के तुरंत बाद छानना नहीं चाहिए। जब तक तेल पूरी तरह ठंडा न हो जाए, उसे छानने की गलती न करें। गरम तेल को छानने से उसका स्वाद और पौष्टिकता दोनों कम हो जाते हैं। इसके अलावा, गरम तेल को छानना सुरक्षा की दृष्टि से भी जोखिम भरा हो सकता है। इसलिए, तेल को कमरे के तापमान तक ठंडा होने के बाद ही छानें, ताकि उसकी गुणवत्ता बनी रहे और वह दोबारा इस्तेमाल के लिए सुरक्षित हो।

जब तेल पूरी तरह से ठंडा हो जाए, तब उसे बारीक छलनी या मलमल के कपड़े की मदद से छानना चाहिए. यह प्रक्रिया अत्यंत महत्वपूर्ण है, क्योंकि इससे तेल में मौजूद जले हुए टुकड़े, आटे के कण या अन्य अवशेष (जो तलने के दौरान गिर जाते हैं) अलग हो जाएंगे। इस प्रकार, साफ किया गया तेल ज्यादा समय तक टिकता है, उसकी गुणवत्ता बनी रहती है, और अगली बार इस्तेमाल में भी खराब स्वाद नहीं देता है, जिससे भोजन स्वादिष्ट बना रहता है।

छने हुए तेल को हमेशा स्टील या कांच के एयरटाइट डिब्बे में ही रखना चाहिए. प्लास्टिक के कंटेनर में रखने से बचना चाहिए, क्योंकि प्लास्टिक के संपर्क में आने पर तेल में रासायनिक बदलाव हो सकता है, जो सेहत के लिए नुकसानदेह होता है। भंडारण के लिए, इसे धूप या गैस के पास रखने की बजाय ठंडी और अंधेरी जगह पर रखें, ताकि इसकी क्वालिटी लंबे समय तक बनी रहे। इसके अतिरिक्त, यह भी ध्यान रखें कि हर बार एक ही तरह के तेल को एक ही कंटेनर में रखें, जैसे सरसों का तेल सरसों के साथ और रिफाइंड तेल रिफाइंड के साथ। ऐसा करने से तेल का स्वाद और खुशबू खराब नहीं होती, और अगली बार बनाया गया खाना भी स्वादिष्ट बनता है।

दोबारा इस्तेमाल करने से पहले तेल को सूंघना बहुत ज़रूरी हैं। अगर तेल से खट्टी या जली हुई गंध आती है, तो यह दर्शाता है कि उसकी गुणवत्ता बहुत खराब हो चुकी है, और उसे फेंक देना ही बेहतर हैं। केवल साफ और ताज़ा गंध वाला तेल ही आप सब्जी या पराठा तलने में इस्तेमाल कर सकते हैं। हालाँकि, स्वास्थ्य विशेषज्ञों की सलाह है कि एक ही तेल को दो बार से ज़्यादा गरम करने से बचें। तेल को बार-बार गरम करने से उसमें हानिकारक ट्रांस फैट और टॉक्सिन्स (विषाक्त पदार्थ) बन जाते हैं, जो लंबे समय में सेहत को नुकसान पहुँचाते हैं। एक ही तेल को बार-बार गरम करने से उसमें ट्रांस फैट की मात्रा बढ़ जाती है, जो दिल और लीवर जैसे महत्वपूर्ण अंगों के लिए हानिकारक होता है। इसलिए, तेल को दोबारा इस्तेमाल करने की सीमा का ध्यान रखना आवश्यक हैं। यदि तेल बहुत ज़्यादा गंदा हो गया हो या उसमें से दुर्गंध आ रही हो, तो उसे सीधे नाली में फेंकने की बजाय, आप उसे मिट्टी में मिलाकर पौधों के गमले में डाल सकते हैं। इस तरह के पुराने तेल का उपयोग मिट्टी में करने से कीड़े-मकोड़े दूर रहते हैं, और यह पर्यावरण को प्रदूषित होने से बचाने का एक सुरक्षित तरीका हैं।

# फक्त १८ मॅच शिल्लक

## किंग कोहली झटक्यात मोडून टाकणार तीन मोठे रेकॉर्ड!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

टीम इंडियाचा किंग असलेल्या विराट कोहलीसाठी २०२५ हे वर्ष खास ठरले. विराट कोहलीने वन-डे संघात कमबॅक तर केले तसेच त्याने आयपीएलमध्ये देखील विजेतेपद पटकावले.

२०२५ च्या वर्षाच्या अखेरीस वन-डे क्रिकेटमध्ये दोन शतके ठोकल्यानंतर विराट कोहली पुन्हा फॉर्ममध्ये आला आहे. त्यामुळे आता २०२६ मध्ये देखील कोहली आपली बॅट तशीच तळपती ठेवणार आहे. अशातच आता तीन रेकॉर्ड किंग कोहलीच्या निशाण्यावर आहेत. ज्याला तो एका झटक्यात मोडू शकतो. विराट कोहली फक्त १८ मॅच यंदाच्या वर्षात खेळेल. त्यामुळे चर्चेला उधाण आले आहे.

आयपीएल २०२६ मध्ये ९००० धावांचा टप्पा गाठणारा पहिला फलंदाज बनण्यासाठी विराट कोहलीला फक्त ३३९ धावांची गरज आहे. सध्या त्याच्या नावावर २५९ डावांमध्ये ८६६१ धावा असून, तो आयपीएलच्या इतिहासातील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. गेल्या तीन आयपीएल हंगामांपैकी कोणत्याही हंगामात कोहलीने ६०० पेक्षा कमी धावा केलल्या नाहीत. त्यामुळे कोहली हा रेकॉर्ड आरामात तोडेल, अशी शक्यता आहे. तर रोहित शर्मा विराटनंतर दुसऱ्या क्रमांकावर आहे. विराट कोहली सचिननंतर मोठा विक्रम प्रस्थापित करण्याच्या तयारीत आहे. सचिन तेंडुलकरनंतर एकदिवसीय क्रिकेटमध्ये १५००० धावा करणारा कोहली दुसरा फलंदाज ठरू शकतो. सचिन तेंडुलकरने ४५२ एकदिवसीय डावांमध्ये १८४२६ धावा केल्या आहेत. तो एकदिवसीय सामन्यांमध्ये १५००० पेक्षा जास्त धावा करणारा एकमेव फलंदाज आहे. कोहलीने सध्या २९६ डावांमध्ये केल्या आहेत आणि तो एकदिवसीय क्रिकेटमधील दुसरा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. त्याचा विक्रम रचण्यासाठी फक्त ४४३ धावांची गरज आहे.

नव्या वर्षातील पहिल्याच मालिकेत कोहली असा विक्रम प्रस्थापित करू शकतो. न्यूझीलंडविरुद्धच्या आगामी मालिकेत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८ हजार रन्सचा टप्पा ओलांडण्यासाठी त्याला आता केवळ २५ रन्सची गरज आहे. कुमार संगकाराचा विक्रम मोडण्यासाठी विराटला केवळ ४२ रन्सची आवश्यकता आहे. संगकाराने आपल्या कारकिर्दीत एकूण २८०१६ रन्स केल्या होत्या. जर कोहलीने न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्याच मॅचमध्ये ४२ रन काढले, तर तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक रन करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचेल.



# तब्बल ७२ गाणी, तुम्ही पाहिला की नाही 'हा' हिंदी चित्रपट


## गीनिज बुकमध्येही नोंद, कुणीच मोडू शकला नाही रेकॉर्ड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हा चित्रपट म्हणजे फक्त एक चित्रपट नाही, तर तो गाण्यांचा महोत्सव आहे. ७२ गाणी असलेला हा चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीतील एक अद्भुत, अजब आणि अभिमानास्पद विक्रम म्हणून ओळखला जातो. या चित्रपटाने आजही जगातील सर्वाधिक गाणी असलेला चित्रपट म्हणून आपले स्थान टिकवून ठेवले आहे.

चित्रपट म्हणजे त्यात गाणी आलीच. चित्रपटाआधी त्या चित्रपटाची गाणीच हिट होत असतात. आता सगळ्यात जास्त गाणी कोणत्या चित्रपटात आहे? असे विचारले तर साहजिकच बहुतेकांच्या तोंडात 'हम आपके है कौन', 'हम साथ साथ है' या चित्रपटांची नावे येतील. 'हम साथ साथ है' या चित्रपटात ७ तर 'हम आपके है कौन'मध्ये १४ गाणी आहेत. आता चित्रपटामध्ये ५-७ गाणी असली, तरी ती प्रेक्षकांना जास्त वाटतात. पण तुम्हाला माहिती आहे का एक असा हिंदी चित्रपट ज्यात तब्बल ७२ गाणी होती.

या चित्रपटामध्ये प्रत्येक प्रमुख पात्रासाठी स्वतंत्र गाणी होती. प्रेम, विरह, सौंदर्यवर्णन, देवसभा, नृत्य, ऋतू वर्णन यासाठी वेगळी गाणी होती. यात ९ ठुमऱ्या, ४ होळी गीते, १५ सामान्य गाणी, ३१ गझल, २ चौबोला, २ छंद आणि २ इतर गाण्यांचा समावेश होता. इतकी गाणी असल्यामुळे चित्रपटाची लांबीही प्रचंड होती. काही




अंदाजानुसार हा चित्रपट साडेतीन तासांपेक्षा जास्त वेळेचा होता.

७२ गाणी असलेल्या या चित्रपटाची गीनिज बुकमध्येही नोंद आहे. गाण्याच्या बाबतीत या चित्रपटाचे रेकॉर्ड आजवर कुणीच मोडलेले नाही. आजपर्यंत कोणताही भारतीय किंवा विदेशी चित्रपट हा विक्रम मोडू शकलेला नाही. चित्रपट अभ्यासक आणि सिनेप्रेमी याचा उल्लेख रेकॉर्ड होल्डर म्हणून करतात. काही जण या चित्रपटामध्ये ७१, तर काही ६९ गाणी असल्याची दावा करतात.

या चित्रपटाची स्टोरी होती एका न्यायप्रिय राजाची. देवांच्या परीक्षेत त्याला एक परी एका गरीब महिलेच्या रूपात भेटते आणि राजा तिच्या प्रेमात पडतो. आता हा चित्रपट कोणता? त्याचे नाव ऐकण्याची उत्सुकता तुम्हाला असेल. तर या चित्रपटाचे नाव आहे 'इंद्रसभा'. १९३२ मध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट उर्दू नाटककार आगा हसन अमानत यांच्या प्रसिद्ध उर्दू नाटकावर आधारित. मूळ नाटकच संगीतप्रधान असल्यामुळे त्याच धर्तीवर चित्रपटही बनविण्यात आला. चित्रपटाचे दिग्दर्शन जे. जे. मदन यांनी केले होते.

**सक्सेस स्टोरी**

# डोळ्यादेखत आईचा अपमान, जिद्दीने गाठले शिखर

## क्लास न लावताच बस कंडक्टरची मुलगी झाली आयपीएस



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

काही जखमा अशा असतात, की ज्या कधीच भरून येत नाहीत. पण त्याच जखमा कधी-कधी माणसाला आयुष्यात काहीतरी मोठे करण्याची जिद्द देऊन जातात. एका बस कंडक्टरच्या मुलीच्या बाबतीतही असेच काहीसे घडले. समाजाचे टोमणे, घराची बेताची परिस्थिती आणि समोर असलेल्या आव्हानांचे डोंगर. या सगळ्यांवर मात करत शालिनी अग्निहोत्री या आज 'आयपीएस' अधिकारी म्हणून मिरवत आहेत. पण या यशाचा प्रवास सोपा नव्हता; तो सुरू झाला होता एका अपमानास्पद घटनेने!

### प्रवास जो आयुष्याला वळण देऊन गेला

शालिनी अग्निहोत्री हिमाचल प्रदेशातील ऊना जिल्ह्यातील रहिवासी. वडील बसमध्ये कंडक्टर होते. एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेल्या शालिनीला आपण आयुष्यात काहीतरी मोठे व्हावे, असे नेहमीच वाटायचे. पण या विचाराला खरी धार एका प्रवासादरम्यान लागली.

शालिनी एकदा आपल्या आईसोबत प्रवास करत होत्या. त्या गर्दीत एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्या आईशी अत्यंत गैरवर्तन केले आणि अपमान केला. आईचा तो केविलवाणा चेहरा आणि झालेला अपमान शालिनीच्या काळजाला चिरून गेला. त्या क्षणी त्यांना जाणीव झाली, की जर आपल्याकडे अधिकार असते, तर कुणीही आपल्या आईचा असा अपमान करण्याची हिंमत केली नसती. त्या दिवशी शालिनीने स्वतःशीच एक गाठ बांधली. अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी आपल्याला 'सक्षम' बनायचे आहे. हीच घटना त्यांच्या आयपीएस बनण्याच्या स्वप्नाची खरी मुहूर्तमेढ ठरली.

### कसे ठरले यूपीएससी करायचे?

शालिनी लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होत्या. त्यांनी दहावीत ९२ टक्के आणि बारावीत ७७ टक्के गुण मिळवून आपली चमक दाखवली होती. शालेय शिक्षणानंतर त्यांनी हिमाचल विद्यापीठातून कृषी शाखेत पदवी घेतली आणि त्यानंतर एम.एस्सी. पूर्ण केले. पदवी शिक्षण सुरू असतानाच त्यांच्या डोक्यात यूपीएससी परीक्षेचे चक्र सुरू झाले होते. त्यांना माहिती होते, की हे शिखर गाठणे सोपे नाही, विशेषतः एका कंडक्टरच्या मुलीसाठी जेथे सोयी-सुविधांचा अभाव होता.

### महागडे कोचिंग न करता मिळविले यश

आजकाल यूपीएससी म्हटले, की दिल्लीला जाणे, लाखो रुपये खर्च करून कोचिंग क्लासेस लावणे, हे समीकरण मानले जाते. मात्र शालिनी यांची आर्थिक परिस्थिती तशी नव्हती. वडिलांच्या तुटपुंज्या पगारात हे सगळे अशक्य होते. पण त्यांनी हार मानली नाही. त्यांनी कोणत्याही कोचिंग क्लासशिवाय स्वतः अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. इंटरनेटवरील साहित्याचा आधार घेत आणि रात्र-रात्र जागून त्यांनी पुस्तकांशी मैत्री केली.

### आयपीएस बनून स्वप्न केले साकार

शालिनी यांच्या मेहनतीला २०११ मध्ये फळ आले. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी २८५ वी रँक मिळवून आयपीएस होण्याचा बहुमान मिळवला. पण त्या तेथेच थांबल्या नाहीत; २०१२ मध्ये त्यांनी पुन्हा ही परीक्षा उत्तीर्ण करून आपली गुणवत्ता सिद्ध केली. ज्या मुलीला एकेकाळी समाजाच्या नजरांनी आणि परिस्थितीने अडवण्याचा प्रयत्न केला होता, तीच मुलगी आज पोलिसांच्या वर्दीत अन्यायाविरुद्ध उभी आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




# डॉ. परीक्षित बाविस्करांच्या जातवैधता प्रमाणपत्रास आव्हान

## जितेंद्र ठाकूर यांची उच्च न्यायालयात याचिका दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या अनुसूचित जमातीच्या जातवैधता प्रमाणपत्रावर आक्षेप घेण्यात आला आहे. शविआचे नगराध्यक्षपदाचे पराभूत उमेदवार जितेंद्र ठाकूर यांनी याबाबत न्यायालयात याचिका दाखल केली आहे. बुधवार, दि. १ जानेवारी नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर यांच्या पदग्रहणाच्या दिवशी ही याचिका दाखल झाल्याने राजकारण ढवळून निघाले आहे. याचिकेत डॉ. बाविस्कर यांनी सादर केलेले अनुसूचित जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र खोटे व बनावट असल्याचा दावा करण्यात आला आहे. या आधाावर डॉ. बाविस्कर यांना नगराध्यक्ष पदावरून अपात्र ठरवून पदावरून पायउतार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

श्री. ठाकूर यांनी याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रात म्हटले आहे, की डिसेंबर २०२५ मध्ये झालेल्या अमळनेर पालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत लोकनियुक्त नगराध्यक्षपदाचे आरक्षण अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव होते. त्या अनुषंगाने मी अमळनेर तालुका शहर विकास आघाडीच्या वतीने उमेदवारी केली होती. माझ्या विरोधात शिवसेनेकडून डॉ. परीक्षित बाविस्कर यांना उमेदवारी देण्यात आली. मात्र, डॉ. बाविस्कर यांचे मल्हार कोळी जमातीचे जात प्रमाणपत्र संशयास्पद आहे. डॉ. बाविस्कर व त्यांच्या कुटुंबियांचा मल्हार कोळी जमातीशी कोणताही संबंध नाही. त्यांनी कथितपणे खोटे पुरावे सादर करून जातवैधता प्रमाणपत्र मिळविले आहे. त्यांचे मूळ गाव असलेल्या पारोळा तालुक्यातील अंबापिंप्री येथे तसेच जळगाव जिल्ह्यातही या जमातीचे अस्तित्व नसल्याचा दावाही याचिकेत करण्यात आला आहे. याच बनावट प्रमाणपत्राच्या आधारे डॉ. बाविस्कर यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले आहे. ही बाब शासन व समाजाची फसवणूक आहे. न्यायालयात सादर करण्यात आलेली कागदपत्रे व पुरावे भक्कम आहेत. चार महिन्यांच्या आत डॉ. बाविस्कर यांना पदावरून पायउतार व्हावे लागेल. जोपर्यंत पदमुक्ती व पुढील कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत मी शांत बसणार नाही.

## सारे काही सहनशक्तीच्या व छळवादाच्या पलिकेडे असल्यानेच कोर्टात धाव : जितेंद्र ठाकूर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : यश-अपयश राजकारणातील अविभाज्य घटक आहेत. प्रेमात व युद्धात सारे काही क्षम्य असते, हेही मला मान्य आहे. मात्र, क्षम्यतेच्याही काही मर्यादा असतात. माझ्या बाबतीत काहींनी या सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. महाभारतातील अभिमन्यूसारखी काहींनी माझी गत केली आहे. मी कधीही कोणत्याही निरपराध, सभ्य व चारित्र्यवान व्यक्तीला त्रास दिला नाही. दिला असल्यास दाखवून द्यावे, हे माझे खुले आव्हान आहे. निव्वळ माझी असह्य बदनामी करून मला हरविण्यात आले, हे मला सहन होत नसल्याने मी डॉ. परीक्षित बाविस्कर यांच्या जातीच्या प्रमाणपत्राबाबत उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. अन्यथा डॉ. बाविस्कर माझे व्यक्तिगत शत्रू नाहीतच, या शब्दात नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत पराभूत झालेले उमेदवार पत्रकार जितेंद्र ठाकूर यांनी ग्लोबल महातेजजवळ आपली बाजू मांडली.

श्री. ठाकूर यांनी सांगितले, की पत्रकार या नात्याने बदनाम, भ्रष्ट, लोकांना त्रास देणारे, नियमबाह्य कामे करणारे अशांचा बुरखा फाडणे हे माझे कर्तव्यच होते. एकही सज्जन माणसाला माझ्यापासून त्रास झालेला नाही. एकही व्यापारी माझ्यापासून कधीही त्रस्त झाला नाही. या सर्वांना माझ्या नावाने पद्धतशिररित्या बदनामीचा प्लॅन करून घाबरविण्यात आले हे कितपत योग्य आहे ? मी सर्वांना त्रास देणारा, चुकीचा व वाईट माणूस असतो तर राज्यातील अनेक मोठे अधिकारी व पदाधिकारी यांनी मला विश्वासू मित्राचा दर्जा दिला असता का ? सर्व प्रकारचे प्रयत्न करूनही ज्यांची विविध क्षेत्रात कामे होत नव्हती, ते अत्यंत विश्वासाने व आपलेपणाने माझ्याकडे येत होते व अजुनही येतातच. या सर्व आडल्या- नडल्यांची नियमबद्ध कामे करण्यासाठी मला काहींना हिसका दाखवावाच लागला. त्यात माझे काय चुकले ? नेहमीच नियमबाह्य कामे करणारे व मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार करणारे अशांनाच माझी भीती वाटते. या अशा अनेकांनी एकत्र येऊन माझ्या विरूद्ध बदनामीचे खूप मोठे षडयंत्र रचले. माझ्या विरोधात पैशांचा भरमसाठ वापर केला आणि मला पराभूत केले. वाईट याचे वाटते, की या षडयंत्रात ज्यांना मी माझ्या जीवा- भावाचे मानत होतो, ज्यांना मी आपले मानत होतो, ज्यांचे मी कधीही कोणत्याही प्रकारचे वाईट केले नाही अशा लोकांनी माझी बदनामी करून माझे चारित्र्यहनन केले. पराभवामुळे नव्हे, तर चारित्र्यहननामुळे मी व माझा परिवार कमालीचा व्यथित आहे. माझी कायदा, परमेश्वरावर व नियतीवर नितांत श्रद्धा आहे. या श्रद्धेपोटीच मी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

## माझ्या पत्नीवर केलेली टिका संस्कृतीबाह्य असल्याने असहनीय..!

**पान १ वरून :** करतो. सर्व जण मला आदराने दादा म्हणतात. ही खरी आपली संस्कृती आहे. कालच्या कार्यक्रमातील असभ्य टिपणीबाबत कार्यक्रमात असलेले व नसलेल्या अनेकांनी दुःख व संताप व्यक्त केला. याचे मला भावनिक समाधान आहे. मोठ्या मुश्किलीने मी गुंडगिरी व काळे धंदे संपविले होते. ते आता पुन्हा बाहेर आले आहे. हे अपप्रवृत्ती आपणच वाढवतो आहोत. एकीकडे लाडक्या बहिणी म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांचा अनादर करायचा हे अयोग्य आहे. सरकार महिलांचे सक्षमीकरण करीत आहे 'हे' मात्र खच्चीकरण करतात. सन २०१६मध्ये पालिका निवडणूक प्रसंगी जे काही घडले होते त्याचीच पुनरावृत्ती पुन्हा घडते की काय ? अशी आशंका वाटू लागली आहे. नगराध्यक्षपदी डॉ. परीक्षित बाविस्कर यांचा विजय माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांच्या चेहऱ्याकडे पाहून झालेला नाही. तरीही पक्ष म्हणून ते क्रेडीट घेत असतील त्यात काही गैर नाही. सदर मोर्चा माझे कार्यकर्ते व संतप्त जनतेने स्वेच्छेने काढला होता.



अमळनेर : शाकंभरी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर श्री मंगळग्रह मंदिरात केलेली आकर्षक फळांची सजावट. (छायाचित्र : नितेश बारी)

# वाळुचे ठेके दिले गेले नसताना व आता दिल्यानंतरही लूट सुरूच..!

## प्रशासन अनभिज्ञ? अमळनेरला कोणी वाली आहे की नाही ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथे वाळुचे ठेके दिले गेले नव्हते तेव्हाही बेसुमार पद्धतीने वाळू माफियांनी नदीला क्रुरपणे लुटले आहे. पैशाच्या मस्तीमुळे आपले कोणीही काहीही बिघडवु शकत नाही याची वाळू माफियांना पूर्ण खात्री आहे. प्रशासनाच्या अंगावर धावून गेल्यानंतरही काहीही फरक पडत नाही, याचा त्यांना सार्थ आत्मविश्वास व अभिमान आहे. आता ठेका दिला गेल्यानंतरही वाळुची नियमबाह्य लूट सुरूच आहे. तहसीलदार रुपेशकुमार सुराणा यांनी मात्र सर्व विषय जिल्हाधिकाऱ्यांच्या आखत्यारिचा असल्याचे सांगून धक्कादायक अनभिज्ञता व्यक्त केली आहे. हे सारे पाहता अमळनेरला कोणी समर्थ वाली आहे की नाही? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

तालुक्यातील मुंगसे व दापोरी येथील नदी पात्रातील वाळुचे ठेके देण्यासंदर्भात प्रशासकीय कारवाई सुरू आहे. दरम्यान, सदर ठिकाणची वाळू ही कोणत्याही यंत्राने उपसू नये. केवळ तगारी आणि पावडी यांचा वापर करूनच उत्खनन व्हावे, असे नमूद आहे. विशेष म्हणजे मुंगसे व दापोरी येथे नदीला अजुनही भरपूर पाणी आहे. या पार्श्वभुमीवर तेथून रेती वाहतूक कशी सुरू झाली? याबाबत चर्चा आहे. याबाबत तहसीलदार सुराणा यांनी सांगितले, की सदर ठेका देण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयातुन मंजूर होतो. ठेका दिल्यानंतर ठेकेदाराला कोणत्या अटी व शर्थींचे पालन करावे लागते त्याची मला माहिती नाही. मुंगसे, दापोरी व नालखेडा येथे विहित नमुन्यात नमूद बाबींप्रमाणे योग्य ते प्रशासकीय चिन्ह व खुणा गाडुन वाळू उपशाची हद्द ठरविली जाते. तसेच सदर बाबींचे प्रशासनाने ड्रोनने शुटिंग करावे असेही अभिप्रेत आहे. मात्र, या सर्व बाबतीत श्री. सुराणा यांनी



कानावर हात ठेवले आहेत.

वर्षानुवर्ष अमळनेरच्या नद्यांना क्रूरपणे लुटले जात असतानाही डोळे बंद करून बसलेले वाळू माफियांचे गॉड फादर यांचे आशीर्वाद आणि 'पैसा बोलता है' या तत्वाने सारे काही आलबेल सुरू आहे.

















॥ मंगल ॥ पान

# श्री शाकंभरी देवी नवरात्रोत्सव : भक्ती, श्रद्धा व सामाजिक बांधिलकीचा संगम

## श्री शाकंभरी पौर्णिमा विशेष

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मातील नवरात्रोत्सवाला विशेष धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक महत्त्व आहे. चैत्र व आश्विन नवरात्रांप्रमाणेच श्री शाकंभरी देवी नवरात्रोत्सव हाही श्रद्धेने व भक्तिभावाने साजरा केला जातो. भक्ती, श्रद्धा व सामाजिक बांधिलकीचा संगम घडल्याची अनुभूती भक्तांना येत असते. या नवरात्रोत्सवाची सांगता शाकंभरी पौर्णिमा या पवित्र दिवशी अर्थात शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ रोजी होत आहे. हा दिवस देवी शाकंभरीच्या कृपेस अर्पण केलेला मानला जातो.

**श्री शाकंभरी देवीचे धार्मिक महत्त्व**

पुराणकथांनुसार दुष्काळ, उपासमार व संकटाच्या काळात देवी पार्वतीने शाकंभरी देवी या रूपात अवतार घेतला. 'शाक' म्हणजे भाजीपाला व 'अंभरी' म्हणजे पालन करणारीअर्थात जी देवी सृष्टीला अन्न देऊन तिचे पालन करते, ती श्री शाकंभरी देवी. देवीने भूमीवर विविध प्रकारच्या वनस्पती, धान्य व फळे उत्पन्न करून मानवजातीचे रक्षण केले, अशी श्रद्धा आहे. त्यामुळे श्री शाकंभरी देवी ही अन्नपूर्णेचे व पर्यावरणाचे प्रतीक मानली जाते.

**नवरात्रोत्सवातील विधी व परंपरा**

श्री शाकंभरी देवी नवरात्रोत्सव काळात देवीची विधिवत स्थापना करून नऊ दिवस पूजा-अर्चा, अभिषेक, आरती, भजन, कीर्तन व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. अनेक ठिकाणी



देवीला विविध प्रकारच्या भाज्या, फळे व धान्यांचा नैवेद्य अर्पण केला जातो. ही परंपरा देवीच्या अन्नदाता स्वरूपाचे दर्शन घडवते. नवरात्र काळात भाविक उपवास, जप, ध्यान व दानधर्म करून आत्मशुद्धीचा मार्ग स्वीकारतात. काही ठिकाणी सामूहिक अन्नदान, गरजूंसाठी धान्य-वाटप व सामाजिक उपक्रम राबवले जातात.

**श्री शाकंभरी पौर्णिमेचे विशेष महत्त्व**

नवरात्रोत्सवाची सांगता शाकंभरी पौर्णिमा या दिवशी होते. पौर्णिमेच्या दिवशी देवीची विशेष महापूजा, होम-हवन व महाआरती केली जाते. भाविक मोठ्या संख्येने देवीचे दर्शन घेण्यासाठी उपस्थित राहतात. या दिवशी केलेली पूजा अन्नसमृद्धी, आरोग्य, सुख-शांती व निसर्गकृपेचे वरदान देते, अशी श्रद्धा आहे. शाकंभरी पौर्णिमा ही केवळ धार्मिक दिवस नसून, निसर्गसंवर्धन, अन्नाचे महत्त्व व पर्यावरण संतुलन यांची जाणीव करून देणारा दिवस आहे. आजच्या आधुनिक युगात या सणाचे महत्त्व अधिकच वाढले आहे.

**सामाजिक व सांस्कृतिक संदेश**


श्री शाकंभरी देवी नवरात्रोत्सव व पौर्णिमा आपल्याला अन्नाचा सन्मान करणे, निसर्गाशी सुसंवाद राखणे व गरजूंना मदत करण्याचा संदेश देतात. अन्नवाया टाळणे, शेती व पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि समाजात समतेची भावना जोपासणे, हा या उत्सवाचा खरा उद्देश आहे. शाकंभरी देवी नवरात्रोत्सवाची सांगता आणि शाकंभरी पौर्णिमा हा भक्ती, श्रद्धा व सामाजिक बांधिलकीचा संगम आहे. देवी शाकंभरीच्या कृपेने सर्वांच्या जीवनात अन्नसमृद्धी, आरोग्य व समाधान नांदो, अशीच प्रत्येक भाविकाची प्रार्थना असते.

# भक्ताला पालनकर्ती जाणवणारे शक्तीपीठ : बनशंकरी देवी मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कर्नाटकातील बागलकोट जिल्ह्याच्या सुपीक आणि पवित्र भूमीत बदामीजवळील चोलचागुड्डा या शांत गावात एक प्राचीन दिव्य शक्तीपीठ विसावले आहे, ते म्हणजे बनशंकरी देवीचे मंदिर. तिलकरण्य जंगलाच्या गाभाऱ्यात वसलेले हे मंदिर जरी बाहेरून साधेपणाने दिसते, तरी शेकडो वर्षांची परंपरा, असंख्य भक्तांची श्रद्धा आणि देवीच्या अंतहीन करुणेने भारलेले वातावरण भक्तांना नेहमीच आकर्षित करत असते. 'बनशंकरी' म्हणजे 'वनातील शंकराची पत्नी' वनदेवी, अरण्यातील शक्ती, निसर्गाशी एकरूप असलेले माता पार्वतीचे रूप; आणि 'शाकंभरी' म्हणजे 'वनस्पतींची, शाकांची देवी', जी भूक, दुष्काळ आणि दारिद्र्य यामधून लोकांना तारते. म्हणूनच येथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला ती पालनकर्ती म्हणून जाणवते.

कथांमध्ये सांगितले जाते, की या प्रदेशात कधीकाळी दुर्गमासूर नावाच्या दैत्याने थैमान घातले होते. त्याच्या अत्याचारामुळे ढग कोरडे पडले, नद्या आटल्या आणि दुष्काळामुळे जमिनीला भेगा पडल्या. जनावरांना चारा नव्हता, घराघरांत उपासमार होती. देवता, ऋषी, साधू सारेच घाबरून देवीकडे गेले. तेव्हा पार्वतीने शाकंभरी रूप धारण केले. आईसाहेबांच्या शरीरावर पानांचे वस्त्र, डोळ्यात अपरंपार करुणा आणि हातात कामधेनूप्रमाणे जमिनीत अन्नधान्य. वृक्ष निर्माण करण्याची अद्‌भुत शक्ती. ...तिने भक्तांच्या भुकेसाठी भाजीपाला, धान्य, कंदमुळे उगवली; रानात पाणी निर्माण केले आणि नंतर दुर्गमासुराचा संहार करून भूमीला पुन्हा सुपीक केले. त्या दिवसापासून ही भूमी बनशंकरीच्या आशीर्वादाने भरभराटली आणि लोकांनी तिला मातृस्वरूप मानून अनादी काळापासून पूजन केले. इतिहासात पाहिले तर या मंदिराचा उगम चालुक्यांच्या ७ व्या शतकातील सुवर्णकाळात झाल्याचे संदर्भ सापडतात.





चालुक्य सम्राटांना कला, स्थापत्य आणि धर्माची विलक्षण जाण होती. त्यांनी या जंगलात देवीचे शक्तीपीठ उभारले. मंदिराचे गर्भगृह द्रविड शैलीचे, तर शिखरात विजयनगरकालीन अलंकारिक कारागिरी जाणवते. काळ्या दगडात कोरलेली देवीची मूर्ती हे या मंदिराचा मुकुटमणी आहे. आठ हातांची माता, हातात त्रिशूल, ख, ढाल, वज्र आणि इतर आयुधे पराक्रम व संरक्षणाचे द्योतक. परंतु तिच्या चेहऱ्यावर अमर्याद शांतता आणि करुण भाव दिसतात. देवी व्याघ्र किंवा सिंहावर आरूढ असून तिच्या पायाखाली दोन हत्ती कोरलेले आहेत. हत्ती म्हणजे सामर्थ्य व स्थैर्याचे प्रतिनिधित्व करतात, तर त्यातूनच असा संदेश मिळतो, की भक्तांच्या जीवनातील सर्व अडथळ्यांना देवी आपल्या चरणाखाली ठेवते, असा अर्थ स्थानिक लोक सांगतात.

मंदिराच्या सभोवताली तीन पवित्र तीर्थे आहेत अगस्तीतीर्थ, हरिद्रातीर्थ आणि तैलतीर्थ. अशी धारणा आहे, की देवीची कृपा मिळण्यासाठी प्रथम या तीर्थांमध्ये स्नान करून तन व मन शुद्ध करावे नंतर भस्म, कुंकू, अक्षता घेऊन मंदिरात प्रवेश करावा. जवळच चंडभैरवाचे एक छोटे मंदिर आहे, जो देवीचा सेनापती मानला जातो. प्रत्येक भक्त प्रथम भैरवाचे अभिवादन करून नंतर मुख्य गर्भगृहात प्रवेश करतो. बनशंकरी देवीची उपासना पद्धत अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथे नवरात्रोत्सवात देवीला भाजीपाला अर्पण करण्याची प्रथा आहे. म्हणूनच तिला 'शाकंभरी' म्हणतात. शेंगदाणे, वांगे, दुधी, गवार, मुळा, नारळ गावकरी स्वतः शेतातील पीक आणून नैवेद्य करतात. त्यांचा विश्वास असतो, की देवीला शाक दिले की घरात कधी अन्न कमी पडत नाही. नवरात्रात मंदिर परिसर हिरव्या भाज्यांनी, फुलांनी आणि दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघतो. हजारो स्त्रिया देवीच्या पायाशी ओटीभर धान्य ठेवतात.

शुक्रवार हा देवीचा अत्यंत शुभ दिवस मानला जातो. त्या दिवशी सकाळपासून लोक रांगांमध्ये उभे दिसतात. कोणी नवस फेडायला, कोणी नवस बोलायला, तर काही फक्त तिच्या विलक्षण दर्शनासाठी येतात. असा विश्वास आहे, की बनशंकरी देवी भक्तांच्या मनातील भीती संपवते, धैर्य देते आणि शत्रूंचा पराभव करण्याची शक्ती देते. अनेक स्थानिक लोक सांगतात, की देवी त्यांच्या स्वप्नात येते, मार्ग दाखवते, संकटातून बाहेर काढते. कलियुगातही जो देव भक्ताला सोडत नाही, अशी लोकमान्यता या देवीबद्दल आहे.
मंदिराची वार्षिक बनशंकरी जत्रा हा दक्षिण भारतातील एक मोठा धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव आहे. दूरदूरच्या गावांतून लोक बैलगाड्यांवरून, गाड्यांवरून, ट्रॅक्टरवरून देवीच्या दर्शनासाठी येतात. मंदिराचे रस्ते त्या काळात सुगंधी फुलांनी, रंगीबेरंगी सजावटीने आणि भक्तांच्या जयजयकाराने गजबजून जातात. 'अम्मा, रक्षा कर' (मराठीत भाषांतर )अशा हाका जागोजागी ऐकू येतात. देवीच्या प्रतिमेची भव्य पालखी निघते आणि गावभरून फिरते. त्या पालखीमागे हजारो भाविक चालतात तर काही तन्मयतेने नतमस्तक होतात. मंदिराचे वातावरण अत्यंत शांत आणि प्रसन्न आहे. तिलकरण्यच्या दाट अरण्यातून वाहणारा मंद वारा, पक्ष्यांचे किलबिल, दूरवर दिसणारा बदामीचा लालसर दगडी पट्टा

हे सर्व मिळून मंदिराला एक रहस्यमय आध्यात्मिक तेज देते. सकाळच्या आरतीचे स्वर तर इतके माधुर्यपूर्ण असतात की मन नकळत शांत होते. अनेक साधक येथे ध्यानधारणा करतात. म्हणतात की, या परिसरात योगी, तपस्वी आणि साधूंनी अनेक वर्षे साधना केली.
बनशंकरी देवीचे महात्म्य केवळ इतिहासात किंवा पौराणिक कथांमध्ये नाही; तर लोकांच्या दैनंदिन जगण्यातही आहे. बागलकोटपासून बेलगावीपर्यंत, सोलापूरपासून सांगलीपर्यंत असंख्य कुटुंबांची कुलदेवी बनशंकरी आहे. परिसरातील शेतकरी पहिले पेरणी करण्यापूर्वी देवीच्या पायाशी माती अर्पण करतात तर व्यापारी व्यवसाय सुरू करण्यापूर्वी देवीच्या नावाने वडी किंवा गूळ देतात आणि स्त्रिया सौभाग्यासाठी ओटी ठेवतात. कित्येक नवविवाहित जोडपी आशीर्वादासाठी प्रथम येथेच येतात.

जसे विविध रंग एकत्र मिळाले की एकच धवल रंग मिळतो तसंच इतिहास, परंपरा, पौराणिक कथा आणि लोकश्रद्धा हे सर्व बनशंकरी मंदिरात एकत्र मिसळून एक अद्वितीय आध्यात्मिक अनुभव बनते. तो अनुभव आपल्याला नवी शक्ती देतो. या सर्व दक्षिणेतील शक्तिपीठांची यात्रा आपल्याला कशी वाटते आहे हे मला कमेंट बॉक्समध्ये नक्की जाणून घ्यायला आवडेल. कारण आपण सर्व उपासना मार्गाचे पथिक आहोत. ती आई आहे सर्वांना सांभाळून घेणारी. आज ना उद्या आपली हाक तिच्यापर्यंत नक्की पोहोचेल. कारण ती शक्तीदात्री आहे. सर्वांची प्रेरक शक्ती तीच आहे. तुमच्या माझ्या हृदयात निवास करून लिखाण करणारी आणि वाचक रूपाने वाचणारी तीच प्रेरक शक्ती आहे. तीच दिव्यदात्री आहे आपल्या मुलाचे कौतुक करणारी. करवून घेणारी तीच आहे.

**श्री मात्रे नमः**

# यंदा वर्षातील पहिली पौर्णिमा कधी?

## २ कि ३ जानेवारी? जाणून घ्या शुभ मुहूर्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू कॅलेंडरमध्ये पौर्णिमेचा दिवस खूप शुभ मानला जातो. २०२६ मधील पहिली पौर्णिमा पौष महिन्याच्या शुक्ल पक्षात येईल. या दिवशी चंद्र त्यांच्या सर्व सोळा चरणांसह आकाशात विराजमान असतो. धार्मिक श्रद्धेनुसार या दिवशी पवित्र नद्यांमध्ये स्नान करणे, दान करणे आणि सूर्यदेवाची प्रार्थना करणे शुभ मानले जाते. शास्त्रांमध्ये असे म्हटले आहे, की पौष महिन्यात केलेले सर्व धार्मिक कार्य पौर्णिमेच्या स्नानानंतरच पूर्ण मानले जातात. पौष पौर्णिमेची तारीख, महत्त्व आणि शुभ वेळ हे सविस्तरपणे जाणू घेऊया.

**आध्यात्मिक आणि धार्मिक महत्त्व**

पौष पौर्णिमा ही हिंदू धर्मात एक खास दिवस मानला जातो. या दिवशी उपवास, स्नान आणि दान केल्याने पापांचे शुद्धीकरण होते. जीवनात आनंद आणि समृद्धी येते. असे मानले जाते, की गंगा, यमुना, सरस्वती किंवा इतर कोणत्याही पवित्र जलस्त्रोतांमध्ये स्नान केल्याने, भगवान विष्णूंची पूजा केल्याने आणि गरजूंना दान केल्याने जीवनातील अडथळे दूर होतात. २०२६ या वर्षात ही पवित्र पौर्णिमा शनिवार, दि. ३ जानेवारी रोजी येत आहे. या दिवशी उपवास आणी पूजा केल्याने मानसिक शांती मिळते आणि आत्मविश्वास वाढतो. शिवाय या दिवशी केलेल्या पुण्यकर्मांमुळे पूर्वजांचे आशीर्वाद देखील मिळतात.

**तारीख आणि वेळ**

हिंदू पंचांगानुसार पौष पौर्णिमा तिथी २ जानेवारी रोजी सायंकाळी ६.५३ वाजता सुरू होईल आणि ३ जानेवारी रोजी दुपारी ३.३२ वाजता संपेल. उदय तिथीनुसार पौष पौर्णिमा व्रत शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ रोजी पाळले जाईल. या दिवशी सायंकाळी ५.२८ वाजता चंद्र उगवेल.

**स्नान आणि दान करण्यासाठी शुभ मुहूर्त**

पंचांगानुसार पौष पौर्णिमेच्या ब्रह्म मुहूर्तावर स्नान करणे आणि दान करणे अत्यंत शुभ मानले जाते. हा शुभ काळ ३ जानेवारीला सकाळी ५.२५ ते ६.२० वाजेपर्यंत असेल. या व्यतिरिक्त अभिजित मुहूर्तावर देखील स्नान करता येते. जो दुपारी १२.०५ ते १२.४६ वाजेपर्यंत असेल.

**पुढील वस्तू कराव्यात दान**


पौर्णिमेच्या दिवशी पांढऱ्या रंगाशी संबंधित वस्तूंचे दान केल्याने शुभ फळे मिळतात. या दिवशी दूध, तांदूळ, साखर, चांदी, पांढरे कपडे आणि पांढरे चंदन यासारख्या वस्तूंचे दान करता येते. तसेच खीर बनविणे आणि प्रसाद म्हणून वाटणे हे पुण्यपूर्ण मानले जाते. पौष पौर्णिमेस गरजूंना बँकेट, लोकरीचे कपडे, तांदूळ, गहू, तीळ, गूळ, तूप आणि दूध दान करणे विशेष पुण्यदायी मानले जाते. असे मानले जाते, की या दिवशी भक्तीने दान केल्यास आयुष्यभर सुख-समृद्धी लाभते.

आशिर्वाद पॅनल
खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर (जि. जळगांव)
त्रैवार्षिक निवडणुक : २०२५-२०२८
मतदान तारीख
रविवार, ता. ४/१/२०२६
सकाळी ८ ते सायं. ५ पर्यंत
जाहिर विनंती
मतदान ठिकाण
प्रताप कॉलेज, अमळनेर (जि. जळगांव)
कार्यकारी मंडळ : सदस्य पदाचे उमेदवार
१ अग्रवाल नीरज दीपचंद (सी.ए.)
(श्री. बजरंगलाल अग्रवाल यांचे पुतणे * संस्था.चेअरमन, स्वामी विवेकानंद स्कुल * कार्याध्यक्ष व संचालक, खा.शि. मंडळ)
३ अग्रवाल प्रदिप कुंदनलाल
(मा. कार्याध्यक्ष व संचालक, खा.शि. मंडळ * संचालक, अर्बन बँक, अमळनेर * गीता प्रोव्हीजन)
४ गुजराथी डॉ. संदेश बिपीन M.B.B.S.
(कार्याध्यक्ष, खानदेश शिक्षण मंडळ, अमळनेर)
६ जैन जितेंद्र मोहनलाल (छोटु जैन)
(मा.कार्याध्यक्ष, खानदेश शिक्षण मंडळ * विजय शॉपी * महावीर गृप, अमळनेर)
१० मुंदडे योगेश मधूसुदन
(कै. श्यामदादा मुंदडे यांचे चिरंजीव * मा. कार्याध्यक्ष व संचालक, खा.शि. मंडळ)
११ पाटील कल्याण साहेबराव (कल्याण बापु)
(कै. आप्पासो. एस. के. पाटील यांचे चिरंजीव व संचालक, खा.शि.मंडळ)
१५ शिंदे डॉ. अनिल नथ्थु
(मा.कार्याध्यक्ष व संचालक, खा. शि. मंडळ, अमळनेर * संचालक, मार्केट कमिटी, अमळनेर)
१६ वाणी हरी भिका
(मा.कार्याध्यक्ष व संचालक, खानदेश शिक्षण मंडळ * मा. संचालक, मार्केट कमिटी, अमळनेर)
आपणांस कार्यकारी मंडळ सदस्य पदासाठी ८ मते देण्याचा अधिकार आहे.
मतदार बंधु-भगिनींना नम्र विनंती की, आम्ही खानदेश शिक्षण मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणूकीत कार्यकारी मंडळ सदस्य पदासाठी 'आशिर्वाद पॅनल' तर्फे उभे आहोत. तरी आपली बहुमोल मते 'आशिर्वाद पॅनल' च्या सर्व उमेदवारांच्या 'पतंग' या चिन्हावर फुलीचा शिक्का मारुन प्रचंड मतांनी विजयी करावे व आपल्या सेवेची संधी द्यावी, ही नम्र विनंती.
निर्धार पक्का ! ''पतंग'' वर फुलीचा शिक्का !!
आपले विश्वासू,
आशिर्वाद पॅनल चे सर्व उमेदवार
* प्रकाशक : श्री. कुंदनलालजी देसराजजी अग्रवाल, श्री. बजरंगलालजी बन्सीलालजी अग्रवाल, श्री. किर्तीकुमार विरचंद शाह, श्री. मोहनलालजी रामलालजी जैन
टिप :- मतदानाला येतांना आधारकार्ड सोबत आणणे अति आवश्यक आहे.
मुद्रक - सत्यनारायण, अमळनेर

# शनिवारी का केली जाते पिंपळाच्या झाडाची पूजा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय संस्कृतीमध्ये पिंपळाच्या झाडाला देववृक्ष मानले गेले आहे. पिंपळाचे झाड प्राचीन काळापासूनच भारतीय हिंदू संस्कृतीमध्ये पूजनीय आहे. असे मानले जाते, की पिंपळाच्या झाडाचे दर्शन-पूजन केल्याने दीर्घायुष आणि समृद्धी प्राप्त होते. परंतु आपणास माहिती आहे का, की शनिवारी पिंपळाच्या झाडाचे शास्त्रात विशेष महत्त्व का आहे?



धार्मिक मान्यतेनुसार शनिवारी पिंपळाच्या झाडाची पूजा केल्याने शनीदेव प्रसन्न होतात. या दिवशी पिंपळाचे पूजन आणि या झाडाला सात प्रदक्षिणा घातल्याने शनिपीडा दूर होते. आयुर्वेदात पिंपळाचे झाड औषधी गुणांनी भरलेले असल्याचे सांगितले आहे. शनी अमावास्येच्या दिवशी पिंपळाच्या झाडाची पूजा केल्याने शनीच्या अशुभ प्रभावापासून मुक्ती मिळते. श्रावण महिन्यात अमावास्या झाल्यानंतर पिंपळाच्या झाडाखाली शनिवारी हनुमानजींची पूजा केल्याने सर्व संकटांतून मुक्ती मिळते. पिंपळाचे झाड ब्रह्मस्थान असून, यामुळे सात्त्विकता वाढते. यामुळे पिंपळाच्या झाडाची शनिवारी पूजा करावी.